# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ११/०९/२०२२ (रविवार)

---

## जबरी चोरी

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** :— अंतर्गत मौजा लोकमत कॉलनी किमी पश्चिम. येथे दिनांक १०.०९.२०२२ चे १७.०० ते १७.१० वा दरम्यान, यातील फिर्यादी हि एकटीच पायदळ लोकमत कॉलनी गल्ली नं. ४ येथील रहिवासी पिंकी आरेकर यांचे घरी जात असता, दोन अज्ञात व्यक्ती हे मोटर सायकल वर आले, त्यातील एका आरोपीने फिर्यादीचे गळ्यातील ३.५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, **अंदाजे कि. १६,४५०/— रू. ची जबरीने हिसकावुन पळुन गेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दयाराम सेलोकर वय ५८ वर्ष रा. लोकमत कॉलनी, रोड नं.३ एमआयडीसी क्वार्टर नं. २१५ बुटीबोरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुट्टीबारी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३९२, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास —सहायक पोलीस निरीक्षक श्री साखरकर पोस्टे बुटीबोरी मो नं ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## शटरचे लॉक तोडुन तांबा तार चोरीं

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत जुन्या आय.टी.आय. चे जवळ आर. सन्स मोटर रिवाईडींग येथे फिर्यादी यांचे दुकान असुन ते दिनांक ०९/०९/२२ चे १९.३० वा दुकानाला कुलुप लावुन घरी निघुन गेले असता, दि. १०/०९/२२ चे १०.०० वा चे सुमारास फिर्यादीचे दुकानात काम करणारा रमेश अलगरे याचा फोन आला व सांगितले की, दुकानात चोरी झाली आहे. त्यानंतर फिर्यादी यांनी दुकानात जावुन पाहीले तर दुकानाचे मागचे शटर चा ताला तोडुन कोणीतरी अज्ञात इसमाने **दुकानाचे आत प्रवेश करून दुकानातील तांबा तार ७० किलो तसेच लिड वायर ३० किलो, असा एकुण ४५,०००/—रू चा माल चोरी झाल्याचे दिसुन आले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे राजेश नरेन्द्रजी उमप वय ४५ वर्ष रा. बुटीबोरी श्रीकृष्ण ले आउट यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे.एम.आय.डि.सी बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५७,३८० भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास — पो हवा/८५२ वेरूळकर मो.क्र. ९४२३६३०८६१ हे करीत आहे.

## केबल तार चोरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— अंतर्गत खरोली ०३ किमी पश्चिम. दिनांक १९/०८/२०२२ ते वा.१०:०० ते दिनांक ०५/०९/२२ वा ०८:०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने रेल्वे खरसोली चौकीपासुन नरखेड कडे १ कि मी अंतरापर्यंतचा तारमधुन १०० मिटर केबल तार १५० स्क्वेअर एम एम केबल किमती ४५,०००/—रू चा माल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले.

. सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अश्विन मदन सोमकुवर वय २६ वर्षे रा.मानकापुर नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पो हवा १६७८ धनराज भुक्ते मो.९८२३६१२८५८ हे करीत आहे

## करंट लागल्याने मृत्यु

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा इस्पात कॉलनी कळमेश्वर ०१ किमी दक्षिण येथे दिनांक ०९/०९/२०२२ चे २३/३० वा दरम्यान, इस्पात कॉलनीचे डेकोरेशन व पेन्डॉल काढीत असताना मालक साजन नारायण पाटील वय ३२ वर्ष रा कळमेश्वर यांना स्ट्रेट लाईटचा करंट लागल्याने ते बेशुध्द झाले, त्यांना उपचार कामी इस्पात कॉलनी येथील दवाखान्यात दाखविले असता, ग्रामीण रुग्णालय कळमेश्वर येथे रेफर केले असता वैदयकीय अधिकारी यांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विजय सुरेश भागवत वय ३६ वर्ष रा शिक्षक कॉलनी वार्ड क्र ०५ गाडगे ले आऊट कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला आहे. सदर मर्ग चा पुढील तपास—पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड मो नं. ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

## अपघात

**पोलीस स्टेशन काटोल** :— अंतर्गत सगमा नगर काटोल १ किमी पुर्व. दिनांक १०/०९/२२ चे १९/३० ते १९/५५ वा दर. यातील मोटर सायकल चालक क्र. एम एच ४० क्यु ४५९४ चा चालक नामे— प्रवीन साहेबराव शेंडे वय ३८ वर्ष रा. सावळी( बु )लिंगा याने आपले ताब्यातील वाहन काटोल कडून नागपुर रोड नी जात असताना भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन बैलाला धडक मारून बैलाचे मरणास व स्वताहा जखमी होण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे पो हवा अरून भेंडे पो. स्टे. काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी नामे— प्रवीन साहेबराव शेंडे वय ३८ वर्ष रा. सावळी( बु )लिंगा यांचे विरूध्द कलम २७९, ३३८, ४२९ भादवी सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा अरून भेंडे ब. न. ६४२ पो. स्टे. काटोल हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**